# मिरा-भाईंदर, वसई-विरार
# पोलीस आयुक्तालय

## माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या
## कलम ४ (१) (ख) अन्वयेची (०१ ते १७ मुददयांची ) माहिती

# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (ख) अन्वयेची
## (०१ ते १७ मुददयांची ) माहिती

**कलम ४ (१) ख (१)**

| | | |
|---|---|---|
| **कार्यालयाचे नाव** | :- | पोलीस आयुक्त कार्यालय मिरा-भाईंदर, वसई-विरार |
| **कार्यालयाचा पत्ता** | :- | सेक्टर-५, शांती गार्डन, मिरारोड (पुर्व), जि.ठाणे ४०१ १०७ |
| **पोलीस आयुक्त** | :- | श्री.मधुकर पाण्डेय |
| **कोणत्या खात्यांर्गत कार्यालय आहे** | :- | गृह विभाग, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| **कार्यकक्ष/भौगोलीक** | :- | पोलीस आयुक्तालयातंर्गत येणारी १९ पोलीस ठाणे |

- प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या न्याय हक्कांच्या रक्षणासाठी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामधील पोलीस कटिबध्द आहेत.
- भिती किंवा प्रलोभनाला बळी न पडता या देशांच्या कायदयांची कसोशीने अंमलबजावणी करण्याचा आमचा संकल्प आहे
- "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" या महाराष्ट्र पोलीसांच्या ब्रीदवाक्याला स्मरुन आम्ही समाजातील सद्‌प्रवृत्तीचे रक्षण तसेच अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवण्याचा सतत प्रयत्न करु.
- कायदे व नियमांचे पालन करुन आपण आमच्या या प्रयत्नांना साथ दयावी ही विनंती आपल्या एकत्रित प्रयत्नांमधुन मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय सुरक्षित व समृध्द बनेल याची मला खात्री वाटते.
- मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कायदयांचे राज्य अबाधित राखीव, कायदयाची ठाम व निपक्षपातीपणे अंमलबजावणी करील प्रगती व समृध्दीसाठी पोषक असे भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबध्द राहिल.
- सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी बांधील राहुन गुन्हयाचा प्रतिबंध करुन त्याचा तत्परतेने शोध लावेण. जातीय सलोखा राखुन तो वृध्दीगत करील आणि समाज विधातक प्रवृत्ती व अवैध कृत्याविरुध्द कठोर कारवाई करेल.
- आम्ही समाजीतील सर्व घटकांची आणि विशेषता दलीत, दुर्बल स्त्रिया, अल्पसंख्यांक, बालके, गरीब आणि वंचीत घटकांची मनोभावे सेवा करु व त्यांना उचित संरक्षण प्रदान करुन आपत्तीग्रस्त नागरीकांना सहृदयतेने तत्पर प्रतिसाद व तात्काळ मदत देउ.
- आम्ही आमचे वैयक्तीक जिवनात उच्च प्रतीच्या सचोटीने आचरण करु पोलीस दलास भ्रष्ट्राचार मुक्त व पारदर्शी करण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहु.
- संरक्षित व सुखकर मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साद्य करु.

| | | |
|---|---|---|
| **ध्येय/धोरण** | :- | • सद्रक्षणाय खलनिग्रहणाय<br>• कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे<br>• शासनाने निर्धारित केलेले नियम/आदेश/सुचनांचे पालन करणे. |
| **साध्य** | :- | • जनतेचे जिवीत व मालमत्तेचे सरक्षण करणे |
| **प्रत्यक्ष कार्य** | :- | • शासनाने ठरवुन दिलेले कामकाज<br>• कायदा व सुव्यवस्था राखणे<br>• सुरळीत वाहतुक<br>• गुन्हे प्रतिबंध, गुन्हे शोध, समाजिक सुरक्षा इत्यादी. |

**<u>कलम ४(१) ख (२)</u>**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ मध्ये पोलीस दलाचे कार्य, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर रित्या नमुद आहे. या कार्यालयातील पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर, वसई-विरार यांना मदत करण्याकरीता पुढिल प्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार मंजुर आहेत.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीनुसार पोलीस ठाणे व कार्यान्वीत शाखा**

| | | |
|---|---|---|
| **कार्यालय प्रमुखांचे नाव पदनाम** | | |
| **पोलीस आयुक्त** | | |
| **अपर पोलीस आयुक्त** | | |
| | | |
| **पोलीस उप आयुक्त परीमंडळ - १ मिरारोड** | सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड | काशिमिरा पोलीस ठाणे |
| | | मिरारोड पोलीस ठाणे |
| | | काशिगाव पोलीस ठाणे |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, भाईंदर | भाईंदर पोलीस ठाणे |
| | | उत्तन सागरी पोलीस ठाणे |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर | नवघर पोलीस ठाणे |
| | | नयानगर पोलीस ठाणे |
| | | खारीगाव पोलीस ठाणे (प्रस्तावित) |
| | | |
| **पोलीस उप आयुक्त परीमंडळ - २ वसई** | सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई | वसई पोलीस ठाणे |
| | | माणिकपुर पोलीस ठाणे |
| | | नायगाव पोलीस ठाणे |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज | तुळींज पोलीस ठाणे |
| | | वालीव पोलीस ठाणे |
| | | आचोळे पोलीस ठाणे |
| | | |
| **पोलीस उप आयुक्त परीमंडळ - ३ विरार** | सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार | विरार पोलीस ठाणे |
| | | पेल्हार पोलीस ठाणे |
| | | मांडवी पोलीस ठाणे |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा | नालासोपारा पोलीस ठाणे |
| | | अर्नाळा पोलीस ठाणे |
| | | बोळींज पोलीस ठाणे |
| | | |
| | | गुन्हे शाखा, कक्ष - १ |
| | | गुन्हे शाखा, कक्ष - २ |
| | | गुन्हे शाखा, कक्ष - ३ |
| | | गुन्हे शाखा, मध्यवर्ती कक्ष |
| | | गुन्हे प्रशासन |
| | | सायबर सेल |
| **पोलीस उप आयुक्त, गुन्हे** | सहाय्यक पोलीस आयुक्त, | अंमली पदार्थ विरोधी पथक |

| | | |
|---|---|---|
| | गुन्हे | अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथक |
| | | होमिसाईड |
| | | दहशतवाद विरोधी कक्ष |
| | | महिला सहाय्य कक्ष |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा | आर्थिक गुन्हे शाखा - ०१ |
| | | आर्थिक गुन्हे शाखा - ०२ |
| **पोलीस उप आयुक्त, मुख्यालय** | सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा | विशेष शाखा |
| | | सुरक्षा शाखा |
| | | सागरी सुरक्षा शाखा |
| | | पारपत्र शाखा |
| | | परदेशी नागरीक शाखा |
| | | |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, मुख्यालय | पोलीस मुख्यालय |
| | | मोटर परिवहन विभाग |
| | | पोलीस कल्याण शाखा |
| | | प्रशिक्षण शाखा |
| | | परवाना शाखा |
| | | प्रशासन |
| | | अर्ज शाखा |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष | पोलीस नियंत्रण कक्ष |
| | | बिनतारी संदेश विभाग |
| | सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग | काशिमिरा वाहतुक शाखा |
| | | वसई वाहतुक शाखा |
| | | विरार वाहतुक शाख |
| | | चिंचोटी वाहतुक शाखा |
| | प्रशासकीय अधिकारी | |
| | कार्यालय अधीक्षक, प्रशासन | आस्थापना शाखा, पत्रव्यवहार शाखा,नोंदणी शाखा, विभागीय चौकशी शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व मार्गदर्शन करणे |
| | कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा | आहरण व संवितरण अधिकारी तसेच लेखा शाखेतील कामकाजावर नियंत्रण व मार्गदर्शन करणे |
| | प्रमुख लिपीक, आस्थापना शाखा | पोलीस भरती तसेच पोलीस अंमलदार यांचे आस्थापना विषयक सर्व कामकाजावर पर्यवेक्षण व मार्गदर्शन करणे |
| | प्रमुख लिपीक, लेखा शाखा | अंदाजपत्रक तयार करणे, वेतन व भत्ते संबंधित सर्व प्रकारची देयकासंबंधी कामकाजावर पर्यवेक्षण व मार्गदर्शन करणे |
| | प्रमुख लिपीक, पत्रव्यवहार शाखा | मनुष्यबळ प्रस्ताव, अस्थायी पदांना मुदत वाढ, आकृतीबंध विषयक कामकाज, प्रबंधक, पोलीस अधिकारी, लिपीक व वर्ग |

| | | |
|---|---|---|
| | | ४ यांचे आस्थापनेचे कामकाजावर पर्यवेक्षण तसेच भांडार पडताळणी, पोलीस कल्याण शाखा, इमारत व पुर्नरचना कामकाजावर पर्यवेक्षण |

## पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वर्गाचे कर्तव्य

## -:पोलीस आयुक्त :-

पोलीस आयुक्त हे कार्यालय प्रमुख आहेत. आयुक्तालयातील पोलीस बलाचे निर्देशन आणि देखरेख यासाठी पोलीस आयुक्त जबाबदार असतात. सर्व मोठया समस्यांबाबत विशेषतः अंमलदार वर्ग यांचे प्रशिक्षण व साधन सामग्री पुरवठा आणि भांडार वस्तु, बलाच्या निर्वाह खर्चासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद, वेगवेगळया श्रेणीतील अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्य यांच्याशी संबंधित सर्व साधारण धोरणांचा समस्यांबाबत निर्णय घेणे. कायदा व सुव्यवस्था राखण्याची आणि गुन्हे प्रतिबंधक व अन्वेषण या संबंधी कार्यक्षमतेच्या गरजेनुसार तपासणी करुन संपर्क साधणे ही पोलीस आयुक्त यांची सर्वसाधारण कर्तव्य असतात. त्यांचे अधिपत्याखाली वर्ग १,२,३ चे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी कार्यरत असतात.

## -:अपर पोलीस आयुक्तः-

अपर पोलीस आयुक्त हे पोलीस आयुक्तांना सहाय्यक अधिकारी म्हणुन निर्माण केलेले पद आहे. अपर पोलीस आयुक्त हे त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शाखा व कार्यालयातील अधिकारी/अंमलदार यांना योग्य ते मार्गदर्शन तसेच प्रशासकीय कामकाज पाहतात.

## -:पोलीस उप आयुक्त (परीमंडळ १, २ आणि ३) :-

पोलीस उप आयुक्त (परिमंडळ १, २ आणि ३) यांचे नियंत्रणाखाली मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, गुन्हयांवर नियंत्रण, गुन्हेगारी प्रतिबंध/ अन्वेषण तपास करण्याचे काम पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी योग्य व कार्यक्षम रितीने करीत असल्याची खातरजमा करणे, पोलीस अधिकारी/अंमलदार वर्गास शिस्त लागु करण्यासाठी तसेच त्यांची समस्या मिटविण्यासाठी पोलीस ठाण्यास अचानक भेटी देऊन अधिकारी/ अंमलदार दक्ष आहेत किंवा हे पाहणे, आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी घेणे, मासिक भेटी देणे, वार्षिक तपासणी दरम्यान अंमलदारांचे सेवा अभिलेख पडताळणी करुन शेरे नोंदविणे, परीमंडळातील गुन्हयाचा आढावा घेऊन गंभीर अपराधाच्या ठिकाणी परिस्थितीनुसार भेटी देणे हे पोलीस उप आयुक्त परिमंडळ यांचे कर्तव्य आहे. सदर कामी यांचे अधिपत्याखालील सहाय्यक पोलीस आयुक्तांना आवश्यक असेल तेव्हा मार्गदर्शन व सुचनाही ते देउ शकतात. हद्दीतील ध्वनिक्षेपणासाठी परवानगी देणे इ.कामे पाहतात.

## -:पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) :-

पोलीस उप आयुक्त मुख्यालय यांचे नियंत्रणाखाली पोलीस कार्यालयातील प्रशासनिक शाखा, मोटार परीवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग आणि पोलीस मुख्यालय हे विभाग येतात. सहा.पोलीस आयुक्त प्रशासन, सहा.पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष आणि सहा.पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश हे त्यांना सदर शाखांचे कामकाज पाहणेसाठी सहाय्यक अधिकारी म्हणुन काम पाहतात त्यांच्या नियंत्रणाखालील विभागांवर सर्वसाधारण देखरेख ठेवण्यास ते जबाबदार असतात. पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहणे तसेच १० वर्षावरील पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहणे. मुख्य पोलीस कार्यालयाच्या नियत्रंणाचे अधिन राहुन करमणुक, मनोरंजन इत्यादींच्या संबंधातील रितसर परवाने देण्याचे काम पाहतात. पोलीस मुख्यालय येथील देखरेखीकामी राखीव पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत असुन पोलीस मुख्यालयातील कार्यकारी दलावर त्यांचे नियत्रंण असते.

या व्यतिरीक्त कार्यालयातील प्रशासकीय शाखा, आस्थापना शाखा, पत्र व्यवहार शाखा, लेखा शाखा, वाचक शाखा इत्यादिंचे कामकाज त्यांचे नियंत्रणाखाली चालते. आस्थापना शाखेमध्ये पोलीस अधिकारी/कर्मचारी /वर्ग-३, लिपीक संवर्ग/वर्ग-४ कर्मचारी यांची आस्थापना त्यांचे वेतन व भत्ते, रजा आदेश निर्गमित करणे, प्रशिक्षण, पोलीस

भरती प्रक्रिया, शिक्षा, बक्षिसे, सेवानिवृत्ती, वेतन वाढ, सेवा ज्येष्ठता, पदोन्नती सेवा ज्येष्ठता सुची तयार करणे, विभागीय चौकशीचे कामकाज इत्यादी कामे आहेत.

विशेष शाखा यांचे नियंत्रणाखाली राजकीय, शासकीय, निमशासकीय व सर्व पक्षाच्या हालचालीची माहिती संकलित करुण घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे, पारपत्र शाखा, विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

मिरा भाईंदर-वसई विरार शहरातील वाहतुक ही चार विभागात विभागलेली असुन प्रभारी अधिकारी यांचे अधिपत्याखाली कार्यरत असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहतुक विभाग | विभागाची हद्द |
|---|---|---|
| १. | काशिमिरा वाहतुक विभाग | काशिमिरा, घोडबंदर, नयानगर, मिरारोड, भाईंदर, उत्तन |
| २. | वसई वाहतुक विभाग | वसई, माणिकपुर, तुळींज, नायगांव |
| ३. | विरार वाहतुक विभाग | नालासोपारा, विरार, बोळींज, मांडवी. अर्नाळा, पेल्हार. |
| ४. | चिंचोटी वाहतुक विभाग | वरसावे ब्रिज ते वाघोबा खिंड पर्यंतचा राष्ट्रीय महामार्ग, महामार्गाच्या दोन्ही बाजुचे सर्विस रोड तसेच पालघर दिशेने जाणाऱ्या महामार्गाच्या उजव्या बाजूचा आयुक्तालयाच्या हद्दीतील संपुर्ण भाग, मौजे कामण ते भिवंडी राज्यमार्ग, शिरसाट फाटा ते गणेशपुरी (वज्रेश्वरी) राज्य मार्ग पर्यंतचा भाग |

पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस कर्मचारी वर्ग यांचे मदतीने शहरातील सर्व वाहतुक मार्गावर नियंत्रण ठेवणे, वाहतुक मार्गावरील बंदोबस्तचे आयोजन व नियंत्रण तसेच सर्व समस्या सोडविणे वाहतुकीचे नियमानुसार नियमांचे भंग करणाऱ्यावर मोटार वाहन कायदयाप्रमाणे केसेस करुन दंड वसुल करणे. तसेच वाहतुक विभागात कार्यरत असलेले १० वर्षावरील पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे, पोलीस अधिकारी यांचे गोपनिय अहवाल लिहणे.

**-:सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय) :-**

सहाय्यक पोलीस आयुक्त हे शासकीय जन माहिती अधिकारी म्हणुन कामकाज पाहतात. मुख्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे. १० वर्षा आतिल पोलीस कर्मचारी यांचे वार्षिक शेरे लिहीणे, प्रशासकीय कामकाज पाहणे, रात्रपाळी गस्ती दरम्यान पोलीस ठाणेस भेट देणे.

**-:सहायक पोलीस आयुक्त (विशेष शाखा ) :-**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील राजकीय, शासकीय, निमशासकीय व सर्व पक्षाच्या हालचालीची माहिती संकलित करुन घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे, पारपत्र शाखा, विदेशी नागरीक शाखेचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे. सागरी सुरक्षा व सुरक्षा शाखेच्या कामावर नियंत्रण ठेवणे.

**-:सहायक पोलीस आयुक्त (विभागीय) :-**

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व गुन्हे प्रतिबंध करणे. तसेच त्यांचे नियंत्रणाखाली असलेल्या पोलीस ठाण्याच्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवणे. १० वर्षा आतील पोलीस अंमलदार यांचे वार्षिक शेरे लिहीणे, पोलीस अधिकारी यांचे गोपनिय अहवाल लिहीणे, प्रशासकीय कामकाज पाहणे, पोलीस ठाणे भेट, दोषारोपपत्राची पडताळणी करणे, पोलीस स्टेशन येथे वार्षिक निरीक्षण घेणे, तडीपार प्रकरणाबाबत चौकशी करणे, तडीपार प्रकरणाचे अहवाल पाठविणे, वरीष्ठांकडुन प्राप्त होणाऱ्या अर्जांची चौकशी करणे.

## -: पोलिस निरीक्षक/प्रभारी अधिकारी कर्तव्य :-

१. पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभारातील क्षेत्रातील गुन्हयांच्या प्रतिबंध आणि तपास तसेच त्यांच्या वरीष्ठांचे आदेश अंमलात आणणे, त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांमध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे हे पाहण्यासाठी फौजदार हे जबाबदार असतात. त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामांची सांगोपांग माहिती करुन घ्यावी व त्यांच्या हाताखालील सर्व पोलीस अंमलदार कर्तव्यावर हजर असुन, कर्तव्यदक्ष आहेत हे पहावे. सार्वजनिक शांततेस बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षक/ प्रभारी अधिकारी यांना माहित होईल तेव्हा त्या शक्यतेची माहिती त्यांना जी खबरदारीची उपाययोजना करणे त्यांना उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवतील. आवश्यकतेनुसार तेव्हा- तेव्हा ते शेजाराच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्याबरोबर थेट पत्रव्यवहार करतील आणि प्रभारातुन निसटुन जाणाऱ्या अथवा निसटुन जावुन त्यांच्या प्रभारात येणाऱ्या अपराध्यांना पकडण्यासाठी त्या प्राधिकाऱ्याबरोबर एक विचाराने कार्यवाही करतील आणि सर्वसाधारणपणे गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचा तपास लावण्यासाठी उपाय योजतील. पोलीस निरीक्षक एखादया विशिष्ठ प्रकरणाचा तपास व्यक्तीशः हाती घेईल तेव्हा फौजदार हे त्यांच्या आदेशानुसार कार्य करतील. परंतु इतर बाबतीत ते निरीक्षकांचे सर्व साधारण निर्देशन व सल्ला यांना अधिन राहुन स्वतंत्र्यपणे कार्य करतील. तथापि यामुळे ते त्यांच्या उपरोल्लिखित जबाबदाऱ्यांमधुन मुक्त होणार नाही आणि दंडाधिकाऱ्यांकडुन अनुज्ञेश मिळाल्याखेरीज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही अशी प्रकरणे नसतील तर आदेशांसाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणामधील त्यांचे कार्य ताबडतोब सुरु करतील.

२. पोलीस आयुक्त/अपर पोलीस आयुक्त/पोलीस उप आयुक्त/सहा.पोलीस आयुक्त निर्देश देतील अशा रितीने पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभागातील पोलीसांची ठरावीक काळाने तपासणी करतील. बलातील व्यक्तींनी केलेला कोणताही निष्काळजीपणा, गैरवर्तणुक किंवा आदेशाची अवज्ञा, रजेशिवाय अनुपस्थिती किंवा त्यांना झालेला अपघात यांचे वृत्त पोलीस आयुक्त/अपर पोलीस आयुक्त/पोलीस उप आयुक्त/सहा.पोलीस आयुक्त यांना कळवतील आणि एकंदरीत त्यांच्या स्वतःच्या पोलीस ठाण्यामधील सुव्यवस्था रक्षणाच्या व्यवस्थेच्या क्षमतेशी संबंधित सर्व बाबींची माहिती वरीष्ठांना सतत पुरवतील.

३. पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकारी त्यांच्या प्रभारातील चौक्यांची महिन्यातुन निदान एकदा तपासणी करावी व अशा वेळी चौक्यांमधील त्यांच्या शिपायांना त्यांच्या कर्तव्याबदल सुचना दयाव्यात.

४. त्यांनी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या कक्षेतील विभागांना/गावांना भेट देऊन पोलीस भेट, नोंद पुस्तके आणि हजेरीपट तपासावे व नियम ७६ मध्ये अंतर्भुत असलेल्या तरतुदी दृष्टीसमोर ठेवुन गावातील गुन्हयासंबंधीच्या नोंदवहया अद्यावत करुन घ्याव्यात. त्यांच्या प्रभारात पडणाऱ्या चालु घडामोडीची माहिती मिळविण्यासाठी प्रत्येक संधी त्यांनी साधावी आणि त्यांच्या सभोवतालच्या लोकांची विशेषतः गुंड व संशयीत व्यक्तींची खरीखुरी माहिती त्यांना असावी. त्यांच्या हाताखालील व्यक्ती बारीक सारीक माहिती मिळविण्यासाठी एकही संधी दवडणार नाही हे पोलीस निरीक्षक/प्रभारी अधिकाऱ्यांनी पहावे.

## -: पोलीस हवालदाराची कर्तव्ये :-

अ) हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणुन नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस बलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाच्या अधिन असतात. हवालदारांना नेमुन देण्यात येईल त्या प्रभाराच्या मर्यादांमध्ये त्यांना दुय्यम असणाऱ्या सर्व पोलीसांकडुन आज्ञा पालन करुन घेण्यास ते हक्कदार असतात.

ब) हवालदारांनी त्यांच्या प्रभारात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असल्यासंबंधीची कोणतीही संभवनीयता त्यांच्या फौजदारांना कळविणे आवश्यक असते. परंतु अपराध्यांना शोधुन त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरु करण्यासाठी त्यांना आदेश मिळविण्यसाठी त्यांनी थांबुन राहता कामा नये.

क) गुन्हयास प्रतिबंध करताना व सुव्यवस्था राखताना हवालदार, त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना देतील अशा आदेशाचे पालन करतील.

ड) अचानक किंवा संशयास्पद रितीने झालेल्या मृत्युच्या बाबतीत हवालदार, किंवा हवालदार हजर नसेल तर शिपाई त्याला फौजदाराकडुन किंवा अन्य वरिष्ठ अधिकाऱ्याकडुन आदेश मिळे पर्यंत प्रेत जाळण्यास, पुरवण्यास किंवा (पाराशांच्या प्रथेप्रमाणे) टाकुन देण्यास प्रतिबंध करतील.
इ) गावातील विशिष्ठ नाक्यांच्या किंवा गस्त क्षेत्रांचा प्रभार हवालदारांकडे असेल त्यावेळी ते पोलीस व्यवस्था विषयक सर्व बाबींमध्ये ग्राम पोलीस प्रमुखांबरोबर एक विचाराने कृती करतील.
फ) हाताखालील पोलीसांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्यांच्य इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्य तात्काळ निदर्शनास आणुन देण्यास हवालदारांना जबाबदार मानण्यात येईल.
ग) हवालदार हे फौजदारांचे सहाय्यक असतात आणि त्यांनी फौजदारांना शिपायांची कवायत घेण्याच्या, शिकवण्याच्या कामात व नाक्यावर वारंवार गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. शिपायांनी केलेली कोणतीही हयगय ताबडतोब पोलीस निरीक्षकांना कळविण्यात यावी.तसेच त्यांच्या प्रशंसनीय कृतीही वरीष्ठांच्या निदर्शनास आणुन द्याव्यात.

## -: पोलीस शिपाई यांची कर्तव्ये :-

१) गुन्हयास प्रतिबंधक व त्याचा तपास करणे, कायदा आणि सुव्यवस्था राखणे, फौजदार प्रक्रिया सहितेनुसार दंडाधिकाऱ्यांचे वॉरंटस आवश्यक असल्यास त्या बाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडणे, त्यांच्या ताब्यात देण्यात येतील असे कैदी, निधी किंवा खाजगी व सरकारी मालमत्ता यांच्या सोबत संरक्षण म्हणुन जाणे व त्यावर पहारा करणे आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या नियम २२ अन्वये पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हवालदार आणि वरिष्ठ आधिकारी आदेश देतील अशी पोलीस व्यवस्थेविषयक कामे शिपाई पार पाडतील.

२) ज्या गुन्हयांसाठी पोलीस वॉरंटवाचुन अटक करु शकतात, असा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायाने आदेशाची वाट न पाहता सहकाऱ्यांच्या माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी अहवाल दयावा.

३) आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय्य करणे व जनतेच्या सुरक्षिततेसाठी आवाक्यात असेल ती प्रत्येक खबरदारी घ्यावी. हे देखील शिपायांचे कर्तव्य असेल.

४) नित्याचे गस्तीचे कर्तव्य शिपाई पार पाडणार नाही. गावामध्ये फेरफटका मारुन काही माहिती मिळते काय हे पाहण्यासाठी शिपायांचा उपयोग करावयाचा नसतो. गस्तवाल्याच्या क्षेत्रात येणाऱ्या कोणत्याही कर्तव्यासाठी शिपायाचा वापर करावयाचा असेल, तेव्हा त्याला नेमक्या सुचना देण्यात आल्या पाहिजे.

## -:पोलीस निरीक्षक मोटार परिवहन शाखा कर्तव्य :-

१. मोटार परिवहन अधिकारी हे त्यांची जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी राहतील.
२. ते प्रशासकीय बाबतीत पोलीस आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबतीत विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परीवहन विभाग, पुणे यांच्या नियंत्रणाखाली असतील.
३. त्यांच्या प्रभारातील सर्व वाहनांच्या अधुन मधुन पुर्ण तपासणी करीता आणि शक्य तोवर नेहमीच वाहने सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असतील.
४. त्यांच्या प्रभारामधील खालील सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवुन देखरेख करतील.
   अ) वाहन दुरुस्ती आणि परिक्षण,
   ब) भांडाराचा व्यवहार (पेट्रोल, ऑईल आणि बंगण व सुटे भाग इत्यादी)
   क) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे,
   ड) प्रशासकीय अभिलेख ठेवणे.
५. त्यांच्य प्रभारातील मोटार परीवहन विभागाची तपासणी वरीष्ठांनी करण्यासाठी जरुर ती व्यवस्था ते करतील आणि सर्व भांडार, खतावणी (लेजर) आणि इतर मोटार परीवहन अभिलेख अद्ययावत ठेवतील, तसेच जरुर ती कारवाई करतील, सुचना आणि तपासणी टिपणीची पुर्तता करतील.

६. त्यांच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या योग्य प्रकारे कर्तव्य वाटप केले जोते.याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील.
७. अधिनियमितता बेशिस्त वाहनांचा गैरवार अद्यावत इत्यादी बाबतची प्रकरणे ते नचुकता आपले वरीष्ठ अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन देतील. पोलीस निरीक्षक, मोटार परीवहन विभाग यांच्या अधिपत्याखाली १) मोटर परिवहन पर्यवेक्षक, २) पोलीस हवालदार, चालक यांत्रिकी (मॅकनिक) हे कामकाज करतात.

## -:लेखा शाखा :-

लेखा शाखेमध्ये वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचारी वर्गाचे वेतन व इतर भत्ते/आकस्मीक खर्चाची देयके तयार करणे, रकमांचे वाटप करणे, पोलीस अधिकारी /पोलीस अंमलदार व मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकीय देयके मंजुर करणे. पोलीस आयुक्तालयासाठी विविध प्रकारचे अनुदान शासनाकडे वार्षिक अंदाजपत्रके पाठवुन मंजुर करुन घेणे इ. कामकाज चालते.

## -:पत्रव्यवहार शाखा :-

पत्र व्यवहार शाखेत अधिकारी आस्थापना, लिपीक वर्ग-३/ वर्ग-४ आस्थापना या व्यतिरीक्त प्रबंधक शाखेत आवक जावक, बारनिशी, टपाल निर्गती स्टेशनरी तसेच कार्यालयीन कामकाजासाठी विविध साहित्याची खरेदी करणे इ.कामे येतात.

इमारत शाखेत कार्यालयीन/पोलीस ठाणेकडील इमारत यांचे देखभाल, दुरुस्ती, भुखंड आरक्षण तसेच प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार शासकीय इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम पुर्ण करुन घेणे इत्यादि कामे येतात.

त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी/कर्मचारी वर्गास निवासस्थाने वाटप, विद्युत देयके, पाणी पट्टी, टेलीफोन, आरोपी आहार भत्ता, घर पट्टी देयके मंजुर करणे इत्यादि कामे स्वतंत्र दप्तरा मार्फत करण्यात येतात.

## -:आस्थापना शाखा :-

पोलीस आयुक्तालयातील पोलीस अंमलदार यांचे हजर, मंजुर, रिक्त पदाची माहिती तयार करणे, पोलीस भरती , पदोन्नती तसेच पोलीस अंमदारांना वार्षिक वेतनवाढ देणे, सेवापटातील नोंदी आद्यावत करणे (रजा, शिक्षा, बक्षिसे इत्यादि.) पोलीस अंमदारांच्या बदल्या, आंतरजिल्हा बदली, रजा, वार्षिक शेरे नोंदवणे, गणवेश भत्ता मंजुर करणे इत्यादि कामकाज चालते.

## -:अर्ज चौकशी शाखा :-

अर्ज शाखेकडे विविध पोलीस ठाणे/शाखांतर्गत प्राप्त झालेले स्थनिक तक्रार अर्ज/शासनाकडे/उपमुख्य मंत्र्याकडील/मुख्यमंत्र्याकडील/पोलीस महासंचालक यांचेकडील तक्रार अर्ज अखत्यारीनुसार संबंधित पोलीस ठाणे/शाखेस चौकशीकामी पाठविणे आणि उचित कार्यवाही अंती अहवाल सादर करणे. जिल्हा/विभागीय लोकशाही दिनातील प्राप्त अर्जावर तसेच जिल्हा/विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीतील अर्जावर अहवाल सादर करणे ही कामे येतात. या व्यतिरीक्त माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांवर कार्यवाही करुन अर्जदारास मुदतीत तपशिल उपलब्ध करुन देणे ही कामे अर्ज चौकशी शाखे मार्फत करण्यात येतात.

## -:परवाना शाखा :-

परवाना शाखेकडे नवीन शस्त्र परवाना/ शस्त्र परावाना नुतनीकरण, सिनेमा परवाना नुतनीकरण, सिनेमा नुतनीकरण, स्फोटक परवाने (शोभेची दारु) रॉकेल परवाने, गेम झोन परवाना, एफएल-३, सिएल-३, पेट्रोलियम, मंजुरी देणे तसेच परवान्याचे नुतनीकरण करण्याचे काम आहे.

## -:पोलीस कल्याण विभाग :-

पोलीस कल्याण शाखेकडे पोलीस कल्याण निधीमधुन पोलीस अधिकारी// अंमलदारांना विविध अनुदान वाटप, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्संबंधी कामे करण्यात येतात. त्याचप्रमाणे पोलीस कल्याण निधी वृध्दीगत करण्यासाठी विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करुन निधी जमा करण्यात येतो. तसेच पोलीस बॅन्ड पथक विविध कार्यक्रमासाठी पुरविणे. त्यांच्यासाठी लागणारे साहित्य खरेदि करणे, क्रिडा साहित्य खरेदि करणे इत्यादि कामे करण्यात येतात.

## पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार मधील

पोलीस अधिकारी यांचे मंजुर/हजर/रिक्त पदांची माहिती (माहे १२/२०२४ अखेरची)

| अ.क्र. | तपशिल | पोलीस आयुक्त | अपर पोलीस आयुक्त | पोलीस उप आयुक्त | सहाय्यक पोलीस आयुक्त | पोलीस निरीक्षक | सहाय्यक पोलीस निरीक्षक | पोलीस उप निरीक्षक | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **मंजुर** | ०१ | ०१ | ०५ | १३ | ७३ | १०९ | २२४ | **४२६** |
| **२** | **हजर** | ०१ | ०१ | ०५ | ११ | ७३ | १०८ | २०२ | **४०१** |
| **३** | **रिक्त** | ० | ० | ० | ०२ | ० | ०१ | २२ | **२५** |

## पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार मधील

पोलीस अंमलदार यांचे मंजुर/हजर/रिक्त पदांची माहिती (माहे १२/२०२४ अखेरची)

| अ.क्र | पदांचे नाव | मंजुर पदे | हजर पदे | | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकुण | |
| १ | सहा.पोलीस उप निरीक्षक | ३५१ | २४५ | ०७ | २५२ | ९९ |
| २ | पोलीस हवालदार | ९८० | ७३५ | ९९ | ८३४ | १४६ |
| ३ | पोलीस नाईक | ० | ३० | ०० | ३० | +३० |
| ४ | पोलीस शिपाई | २५३६ | १३७१ | ५०१ | १८७२ | ६६४ |
| | **एकुण (अ)** | **३८६७** | **२३८१** | **६०७** | **२९८८** | **८७९** |
| १ | चालक सहा.पो.उपनिरीक्षक | ११ | ० | ० | ० | ११ |
| २ | चालक पो.हवालदार | १७ | ० | ० | ० | १७ |
| ३ | चालक पोलीस शिपाई | ९० | ०९ | ०१ | १० | ८० |
| **एकुण (ब)** | | **११८** | **०९** | **०१** | **१०** | **१०८** |
| **एकुण (अ+ब)** | | **३९८५** | **२३९०** | **६०८** | **२९९८** | **९८७** |

**कलम ४ (१) ख (३)**

नमुना व कार्यपध्दती ही महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मध्ये नमुद केलेली आहे तसेच वेळोवेळी गृह मंत्रालय महाराष्ट्र शासन, मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे अधिसुचनेव्दारे आदेश पारीत करीत असतात.

**कलम ४ (१) ख (४)**

अभिलेखाची जपणुक करण्याची माणके ही महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-२ मधील प्रकरण ०८ नुसार खालीलप्रमाणे नोंदवहया ठेवणेबाबत सुचित केले आहे. त्याअनुषंगाने आवश्यक त्या नोंदवहया अभिलेखावर ठेवण्यात आलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ठाणे दैनंदिनी | ३७. | वाहतुक अपघात नोंदवही |
| २. | अदखलपात्र नोंदवही | ३८. | लाईन हजेरी पुस्तक |
| ३. | गुन्हे नोंदवही (क्राईम रजिस्टर) | ३९. | भरारी पथक दैनंदिनी |
| ४. | स्थानिक कायदयाची प्रकरणे नोंदवही | ४०. | दुरध्वनी संदेश पुस्तक |
| ५. | लॉकअप नोंदवही | ४१. | अधिकाऱ्यांचे लघु-रजा पुस्तक |
| ६. | मराठी लॉकअप नोंदवही | ४२. | प्रकरण कागदपत्रांची ये-जा नोंदवही |
| ७. | मराठी दैनंदिनी | ४३. | प्रत्यर्पण नोंदवही |
| ८. | प्रथम खबरी पुस्तक (एफ.आय.आर.बुक) | ४४. | टिपणी पुस्तक |
| ९. | आखरी अहवाल पुस्तक | ४५. | सहाय्यक पोलीस आयुक्तांचे आदेश पुस्तक |
| १०. | जामिन जमा पुस्तक | ४६. | पोलीस निरीक्षक आदेश पुस्तक |
| ११. | सुरक्षित जमा पुस्तक | ४७. | विभागाचे स्थायी आदेश पुस्तक |
| १२. | मुद्देमाल पुस्तक | ४८. | ठाण्यांना पुरवलेली पुस्तके व कायदे नोंदवही |
| १३. | किरकोळ बिल पुस्तक | ४९. | कोर्ट कामकाज नोंदवही |
| १४. | कोषापालाची रोजकिर्द | ५०. | अंगुली मुद्रा केंद्र अभिलेख पुस्तक |
| १५. | भत्ता पुस्तक | ५१. | अंगुली मुद्रा पत्रिका पुस्तक |
| १६. | संकीर्ण पावती पुस्तक | ५२. | घरी पाठविलेल्या मुलांची नोंदवही |
| १७. | पावती पुस्तकांचा हिशेब | ५३. | पोलीस शिपायांच्या पत्यांचे मराठी पुस्तक |
| १८. | पावती पुस्तकांचा हिशेब | ५४. | पोलीस शिपायांचे मराठी रजा पुस्तक |
| १९. | जामीन बंधपत्र पुस्तक (मोठे) | ५५. | पाणी वापर नोंदवही |
| २०. | जामीन बंधपत्र पुस्तक (छोटे) | ५६. | गुन्हे कार्यप्रणाली नोंदवही |
| २१. | कलम ३५६ इसमांची नोंदवही | ५७. | दोषारोप अहवाल पुस्तक |
| २२. | माहितगार मवाली नोंदवही | ५८. | अनुसूची पुस्तक |
| २३. | जड संग्रह नोंदवही | ५९. | लेखा सामग्री आणि नमुन्यांच्या पावत्यांची आणि अदा नोंदवही. |
| २४. | इलेक्ट्रीकल फिटींग नोंदवही | ६०. | रस्त्यालगतच्या मृत्युवरील खर्चाची नोंदवही |
| २५. | हजेरी पट | ६१. | चोरीस गेलेल्या अगर हरवलेल्या सायकलींची नोंदवही |
| २६. | पत्रव्यवहाराची नोंदवही.(अधिकारी) | ६२. | बाल न्यायालय दैनंदिनी |
| २७. | जावक पुस्तक | ६३. | भाडोत्री निवासस्थानांची नोंदवही |
| २८. | कलम ८५-४-०२ नोंदवही | ६४. | लाकडी फिरती पोलीस चौकी नोंदवही |
| २९. | रेल्वे वॉरंट पुस्तक<br>अ) नमुना पी.अे.२५ ई आणि एम | ६५. | मराठी हॉस्पीटल दैनंदिनी |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) नमुना जेल १०८ | | |
| ३०. | सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या कार्यालयाचे वॉरंट बुक | ६६. | रजेवरील अधिकाऱ्यांचे मराठी पत्ता पुस्तक |
| ३१. | अटक वॉरंट पुस्तक | ६७. | आवक नोंदवही |
| ३२. | जप्ती वॉरंट पुस्तक | ६८. | जावक नोंदवही |
| ३३. | चलन पुस्तक | | |
| ३४. | लॉकप चिठी पुस्तक | | |
| ३५. | आजारी चिठी पुस्तक | | |
| ३६. | परिविक्षा अधिकाऱ्याची वैयक्तीक दैनंदिनी | | |

**<u>कलम ४ (१) ख (५)</u>**

पोलीस आयुक्तालयाचे कामकाज हे महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १, २, ३ प्रमाणे चालते फौजदारी स्वरुपाच्या गुन्हयांचे कामकाज भारतीय दंडविधान संहिता कलमान्वये चालते. या व्यतिरीक्त मोटार परीवहन अधिनियमान्वये मुंबई पोलीस ॲक्ट वित्तीय व कोषागार नियमावली तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे कामकाज चालते.

मिरा भाईंदर - वसई विरार पोलीस दलाची कर्तव्य पार पाडण्याकरीता उपलब्ध असणारे नियम/अधिनियम/ सुचना/मॅन्युअल/अभिलेख :-

१) भारतीय न्याय संहिता, २०२३
२) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३
३) भारतीय साक्ष अधिनियम २०२३
४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१
५) मोटार वाहन अधिनियम १९८८
६) मोटार यान चलन विनियम २०१७
७) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००
८) रेल्वे अधिनियम १९८९
९) लैंगिक अपराधा पासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२
१०) कामाचे ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणुक करण्यास अधिनियम २०१३
११) माहिती अधिकार अधिनियम २००५
१२) स्थावर संपदा अधिनियम २०१६
१३) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९
१४) बालकांची देखभाल व संरक्षण अधिनियम २०००
१५) गुंगीवर औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५
१६) शस्त्र अधिनियम १९५९
१७) महाराष्ट्र (मुंबई) दारुबंदी अधिनियम १९४९
१८) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८
१९) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५
२०) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७
२१) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९
२२) बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६
२३) सिगारेट व इतर तंबाखु उत्पादने अधिनियम २००३
२४) महाराष्ट्र हॉटेल, उपहार गृहे आणि मद्यपान कक्ष या मधील अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६

२५) महाराष्ट्र भिक मागण्या प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९५९
२६) महाराष्ट्र ठेविदारांच्या हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९
२७) महाराष्ट्र लॉटऱ्या आणि बक्षिस स्पर्धा अधिनियम १९५८
२८) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोना यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चटन करण्याबाबत अधिनियम २०१३
२९) महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९७६
